# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्ष 1989 मध्ये स्थापिलेले)

**सभा व दप्तर कक्ष**

---

ज्ञानगंगा घरोघरी

# विद्वत परिषद बैठक

## कार्यवृत्त

बैठक क्रमांक : 65

स्थळ : **प्रशासकीय इमारत विद्यापीठ सभागृह (Offline/Online)**

दिनांक : सोमवार. 13 जानेवारी 2025

वेळ : सकाळी 11 : 30 वाजता

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**(महाराष्ट्र शासनाने वर्ष 1989 मध्ये स्थापिलेले)**

---

## 65वी विद्वत मंडळ बैठक

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाची 65 वी बैठक (ऑनलाईन व ऑफलाईन) पद्धतीने सोमवार, दि. 13 जानेवारी 2025 रोजी दुपारी 11.30 वा. आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस पुढील सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| 01 | मा. प्रा. संजीव सोनवणे, कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | अध्यक्ष | |
| 02 | मा. डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, मा. प्र-कुलगुरू आणि संचालक, बहुविद्याशाखीय विद्याशाखा | सदस्य | |
| 03 | मा. डॉ. संजय चाकणे, प्राचार्य, T.J. College, खडकी, पुणे | सदस्य | |
| 04 | मा. श्री. महेश दाबक, आनंदनगर, नाशिक | सदस्य | |
| 05 | मा. श्री. राजेश पांडे, शिवाजी नगर, पुणे | सदस्य | |
| 06 | मा. श्री. विलास विष्णू शिंदे, आडगाव नाशिक | सदस्य | ऑनलाईन उपस्थित |
| 07 | मा. श्री. मधुकर गवळी, मु.पो. उगाव, ता. निफाड, जि. नाशिक | सदस्य | ऑनलाईन उपस्थित |
| 08 | मा. डॉ. संजय तांबट, सिंहगड रोड, पुणे | सदस्य | ऑनलाईन उपस्थित |
| 09 | मा. श्री. संजय वझे, कल्याण (प), जि. ठाणे | सदस्य | ऑनलाईन उपस्थित |
| 10 | मा. धनंजय बेळे, नाशिक | सदस्य | ऑनलाईन उपस्थित |
| 11 | मा. डॉ. नागार्जुन वाडेकर मा. संचालक, मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा आणि संचालक, भाषा साहित्य व सांस्कृतिक अभ्यास विद्याशाखा | सदस्य | |
| 12 | मा. डॉ. सुरेंद्र पाटोळे, मा. संचालक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | सदस्य | |
| 13 | मा. डॉ. संजीवनी महाले, मा. संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा | सदस्य | |
| 14 | मा. डॉ. चेतना कामळसकर, मा. संचालक, विज्ञान विद्याशाखा | सदस्य | |
| 15 | मा. श्री. माधव पळशीकर, संचालक, संगणकशास्त्र विद्याशाखा | सदस्य | |
| 16 | मा. डॉ. माधुरी सोनवणे, संचालक, कृषी विज्ञान विद्याशाखा | सदस्य | |
| 17 | मा. डॉ. कविता साळुंके, ऑनलाईन एज्युकेशन विद्याशाखा | सदस्य | |
| 18 | मा. डॉ. राम ठाकर, संचालक, व्यावसायिक शिक्षण आणि कौशल्य विकास विद्याशाखा आणि नियोजन अधिकारी, नियोजन व सुसूत्रीकरण विभाग | सदस्य | |
| 19 | मा. श्री. अभिषेक भागवत, संचालक, विकासात्मक अभ्यास विद्याशाखा | सदस्य | |
| 20 | मा. डॉ. रश्मी रानडे, प्र-संचालक, आरोग्य विज्ञान विद्याशाखा | सदस्य | |
| 21 | मा. डॉ. प्रकाश बर्वे, उपग्रंथपाल, ज्ञानस्रोत केंद्र | सदस्य | |
| 22 | मा. डॉ. लतिका गायकवाड, सहा. प्राध्यापक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | सदस्य | |
| 23 | मा. डॉ. दयाराम पवार, प्रमुख विद्यार्थी कल्याण व बहि:शाल केंद्र | सदस्य | |
| 24 | मा. श्री. राजेंद्र वाघ, कृषी विज्ञान विद्याशाखा | सदस्य | |

| | | | |
|---|---|---|---|
| 25 | मा. डॉ. मधुकर शेवाळे, संचालक, अंतर्गत गुणवत्ता व आश्वासन कक्ष | सदस्य | |
| 26 | मा. डॉ. नितीन ठोके, कृषी विज्ञान केंद्र | सदस्य | |
| 27 | मा. प्रा. डॉ. प्रकाश देशमुख, संचालक, विद्यार्थी सेवा विभाग | निमंत्रित सदस्य | |
| 28 | मा. प्रा. डॉ. सज्जन थूल, प्र.संचालक, मूल्यमापन विभाग | निमंत्रित सदस्य | |
| 29 | मा. श्री. भट्टप्रसाद पाटील, परीक्षा नियंत्रक, परीक्षा विभाग | निमंत्रित सदस्य | |
| 30 | मा. दिलीप भरड | सदस्य-सचिव | |

पुढील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| 01 | मा. डॉ. जयदीप निकम, संचालक, निरंतर शिक्षण विद्याशाखा | सदस्य |
| 02 | मा. डॉ. अजय भामरे, प्र-कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, मुंबई | सदस्य |
| 03 | मा. डॉ. राजेंद्र विखे पाटील, अध्यक्ष व कुलपती, प्रवरा मेडिकल सायन्स संस्था मु.पो. लोणी, ता. रहाता, जि. अहिल्यानगर | सदस्य |

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्ष 1989 मध्ये स्थापिलेले)

## 65वी विद्वत परिषद बैठक

## विषयपत्रिका

**सोमवार 13.01.2025** **सकाळी 11:30 वाजता**

| विषय क्रमांक | | तपशील |
|---|---|---|
| 65.1.0 | | बैठकीसाठी ऑनलाईन\ऑफलाईन असलेल्या सर्व सन्माननीय सदस्यांचे विद्वत परिषदेचे सदस्य सचिव श्री. भरड यांनी स्वागत केले. |
| | | विद्वत परिषदेचे अध्यक्ष मा. कुलगुरू यांनी विद्यापीठातील विविध क्षेत्रातील प्रगती आणि चालू असलेल्या कार्याची माहिती सर्व सदस्यांना अवगत व्हावे म्हणून आढावा घेतला.<br>1. विद्यापीठाच्या 12 शिक्षणक्रमांना विद्यापीठ अनुदान आयोग आणि दूरशिक्षण परिषदेने मान्यता दिली.<br>2. विद्यापीठाने 'महास्वयंम'ची जबाबदारी स्विकारली असून त्या अंतर्गत 90 व्हिडीओ तयार करण्यात आले आहे. त्यातील Pilot Study अंतर्गत 500 विद्यार्थ्यांसाठी हा प्रयोग करण्यात येणार आहे.<br>3. महाराष्ट्र शासनाच्या Digital University या संकल्पनेसाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाला उन्नत विद्यापीठ म्हणून महाराष्ट्र शासनाने संधी दिली आहे. यासाठी कायद्यात दुरुस्ती करणे आवश्यक आहे. कायद्यातील सुधारणेसाठी कुलसचिवांचे काम सुरू आहे. येत्या 5 वर्षांत व्याप्ती वाढून जगभरातून 1 कोटी विद्यार्थी संख्या अपेक्षित आहे.<br>4. पालघरमध्ये सगळ्यात मोठे 'वाढवन' बंदर होत आहे. बंदरात काम करण्यासाठी खूप मोठे मनुष्यबळ लागणार आहे. यासाठी JNPT यांचेशी सामंजस्य करार करून skilled आणि unskilled सारखे शिक्षणक्रम तयार करता येणार आहेत.<br>5. मा. दाबक सरांनी Rural Technology ही संकल्पना मांडली. Rural Technology वर आधारित एक National Conference विद्यापीठाने आयोजित करावी ह्या दाबक सरांनी मांडलेल्या सुचनांचे मा. कुलगुरूंनी स्वागत केले आणि सुचनांचा विचार करून येत्या काळात विद्यापीठ कार्यवाही करेल असे सांगितले.<br>6. 'मंदिर व्यवस्थापन' हा एक सध्याच्या काळातील अतिशय गरजेचा असलेला शिक्षणक्रम सुरू करण्याविषयीची कार्यवाही सुरू करावी अशी चर्चा पुढे आली.<br>7. मा. चाकणे सरांनी सहकार व्यवस्थापनाविषयी विद्यापीठाने शिक्षणक्रम विकसित करण्याविषयी सुचित केले. त्यावरही काम करता येईल असे मा. कुलगुरूंनी सांगितले.<br>8. येत्या काळात रोजगार निर्मिती होणाऱ्या रोजगाराभिमुख विविध शिक्षणक्रमांची (Design of Degree) रचना करावी लागेल. विद्यार्थ्यांना विविध पर्याय (Basket Choice) उपलब्ध करून द्यावे लागतील. यावरही मुक्त विद्यापीठात काम सुरू असल्याचे मा. कुलगुरूंनी सांगितले.<br>9. मा. प्र-कुलगुरू यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रम तयारीबाबत विद्याशाखानिहाय सर्व संचालकांसोबत सभागृहाला आढावा सादर केला. |

| | | |
|---|---|---|
| | | मा. कुलगुरू तथा अध्यक्ष यांच्या परवानगीने विषयपत्रिकेतील विषयांवर चर्चेस प्रारंभ करण्यात आला. |
| 65.2.0 | 65.2.1 | दि. 4 जुलै 2024 रोजी झालेल्या 64 व्या विद्वत परिषद बैठकीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.<br>**ठराव** – सदस्य सचिव श्री. भरड यांनी 64 व्या विद्वत परिषद बैठकीचे कार्यवृत्त वाचून दाखवले. त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 65.2.2 | दि. 4 जुलै 2024 रोजी झालेल्या 64 व्या विद्वत परिषद बैठकीतील निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल.<br>**ठराव** – सदस्य सचिव श्री. भरड यांनी 64 व्या विद्वत परिषद बैठकीतील निर्णयावरील कार्यवाहीचा सादर केला. त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| 65.3.0 | | **सखोल चर्चेचे विषय** |
| | 65.3.1 शिक्षणशास्त्र विद्याशाखा | शिक्षणशास्त्र विद्याशाखेची विद्याशाखा परिषद बैठक क्र. 62 दि. 04 सप्टेंबर 2024 रोजी घेण्यात आली. सदर बैठकीचे सदर बैठकीचे इतिवृत्त मा. विद्वत परिषदेच्या मान्यतेस्तव सादर<br>**टिपणी** – शिक्षणशास्त्र विद्याशाखेची विद्याशाखा परिषद बैठक क्र. 62 दि. 04 सप्टेंबर 2024 रोजी घेण्यात आली. सदर बैठकीचे इतिवृत्त मा. विद्वत परिषदेच्या अवलोकनार्थ आणि मान्यतेस्तव सादर...<br>**ठराव** – शिक्षणशास्त्र विद्याशाखा संचालकांनी विद्याशाखा परिषदेत मान्य झालेल्या एम. ए. पालकत्व, विशेष शिक्षण, दिव्यांगांसाठी विशेष NAB यांचेशी केलेल्या करारानुसार शिक्षणक्रम विकसित करून सुरू करण्यात येत आहेत याची माहिती दिली. मा. कुलगुरूंनी एम.ए. पालकत्व या शिक्षणक्रमासाठी नोकरी करणाऱ्या पालकांच्या समस्या व जबाबदाऱ्या, अपेक्षा आणि भारतीय परिवाराची मुल्ये यांचा विचार करून विचारात घेण्यासाठी विद्यापीठात 1 दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्याची सुचना केली. या सूचनेसह शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या सर्व विषयांना सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 65.3.2 शिक्षणशास्त्र विद्याशाखा | बोर्ड ऑफ ओपन स्कूलिंग अॅन्ड स्कील एज्युकेशन यांचे 26 नोव्हेंबर 2024 चे पत्र मा. विद्वत परिषदेवर विचारार्थ सादर...<br>**टिपणी** – बोर्ड ऑफ ओपन स्कूलिंग अॅन्ड स्कील एज्युकेशन यांचे 26 नोव्हेंबर 2024 चे Equivalence to/Recognition of BOSSE (Board of Open Schooling and Skill Education), Sikkim, for purposes of higher studies in Yashwantrao Chavan Maharashtra Open University – reg. या संदर्भातील पत्र प्राप्त झाले आहे. सदर पत्र मा. विद्वत परिषदेच्या अवलोकनार्थ आणि विचारार्थ सादर...<br>**ठराव** – मा. संचालकांनी मांडलेल्या विषयासंदर्भात विद्याशाखेला प्राप्त पत्रात 10 वी / 12 वी नापास विद्यार्थ्यांच्या समकक्षतेचा उल्लेख आहे. परंतु हे महाराष्ट्राबाहेरील विद्यार्थी असल्याने या विद्यार्थ्यांना आपल्या विद्यापीठात प्रवेश द्यावा लागेल असे मत मा. संचालकांनी मांडले. विद्यापीठाला मान्यता देणाऱ्या विद्यापीठ अनुदान आयोग व दूरशिक्षण परिषद यांचे निकष तपासून घेण्याच्या सूचनेनुसार विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला. |
| | 65.3.3 विज्ञान विद्याशाखा | विज्ञान विद्याशाखेची विद्याशाखा परिषद बैठक दि. 15 ऑक्टोबर 2024 रोजी घेण्यात आली. सदर बैठकीचे इतिवृत्त मा. विद्वत परिषदेच्या मान्यतेस्तव सादर....<br>**टिपणी** – विज्ञान विद्याशाखेची विद्याशाखा परिषद बैठक दि. 15 ऑक्टोबर 2024 रोजी घेण्यात आली. सदर बैठकीचे इतिवृत्त मा. विद्वत परिषदेच्या मान्यतेस्तव सादर.... |

| | | |
|---|---|---|
| | | **ठराव** – मा. संचालकांनी मांडलेल्या विद्याशाखा परिषदेतील विषयांमधील शुल्काच्या विषयावर बरीच चर्चा झाली. शैक्षणिक वर्ष 2025 पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार नव्याने सुरु होणाऱ्या शिक्षणक्रमांसाठी क्रेडिट बेस शुल्काची रचना करण्यात यावी असे सर्वांनी मत मांडले. सर्व विद्याशाखांच्या शुल्काबाबत ज्या शिक्षणक्रमांचे शुल्क यापूर्वीच ठरले आहे पण विषयांमध्ये वाढ झाली आहे तरीही शुल्कात वाढ न करता शुल्काचे क्रेडीटनुसार विभाजन करावे अशी सूचना मा. कुलगुरूंनी मांडली. इतिवृत्तास सर्वांनी मान्यता दिली. |
| | 65.3.4<br>मूल्यमापन विभाग | 1. विद्यापीठाच्या मे 2023 आणि जानेवारी 2024 मध्ये आयोजित परीक्षांच्या निकालाची चिकित्सा मा. विद्वत परिषदेसमोर माहितीस्तव सादर...<br><br>2. पीएच.डी. पदवी व पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमातील संशोधन अहवालाच्या मूल्यांकनासाठी 96 रुब्रीक्सचा वापर करणेबाबतचा प्रस्ताव मा. विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर...<br><br>**टिपणी** – मूल्यमापन विभागाने विद्यापीठाच्या मे 2023 आणि जानेवारी 2024 मधील परीक्षांच्या निकालाची चिकित्सा केलेली होती. सादर निकालाची चिकित्सा परीक्षा मंडळासमोर ठेवली होती. परीक्षा मंडळाने सादर विषय विद्वत परिषदेत ठेवणेबाबत शिफारस केलेली आहे. सदर निकाल चिकित्सा विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर....<br><br>मूल्यमापन विभागाने लघु संशोधन करून संशोधनाच्या मूल्यांकनासाठी 96 रुबीक्स विकसित केलेले आहेत. या 96 रुब्रीक्स राबविण्याची पुस्तिका विकसित केलेली असून ती पीएच.डी. पदवी व पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमातील संशोधन अहवालाच्या मूल्यांकनासाठी वापरण्यासाठी मान्यता मिळावी, ही विनंती. मूल्यमापन सल्लागार समितीच्या ठराव क्र. 03.10.00 नुसार सदर ठराव विद्वत समितीसमोर मान्यतेसाठी ठेवावा असे ठरले आहे. त्यानुसार सदर ठराव विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर...<br><br>**ठराव** –<br><br>1) विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी आणि त्यांचे उत्तीर्णतेचे प्रमाण यासाठी विद्यापीठातील प्रश्नपत्रिकांची गुणवत्ता वाढवावी.<br><br>2) प्र. संचालक, मूल्यमापन विभाग यांनी संशोधन अहवालाच्या मूल्यांकनासंबंधी 96 रुबीक्स वापराबाबत येणाऱ्या विद्वत परिषदेत या विषयाचे सखोल Presentation करण्याची सूचना मा. कुलगुरू सरांनी केली. मा. कुलगुरूंच्या सूचनेसह सदर विषयाला सर्वानुमते तत्वतः मान्यता देण्यात आली. |
| | 65.3.5<br>स्कूल ऑफ ऑनलाईन लर्निंग | स्कूल ऑफ ऑनलाईन लर्निंगची विद्याशाखा परिषद दि. 30 ऑगस्ट 2024 रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त मा. विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर....<br><br>**टिपणी** – स्कूल ऑफ ऑनलाईन लर्निंगची विद्याशाखा परिषद दि. 30 ऑगस्ट 2024 रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त मा. विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर....<br><br>**ठराव** – स्कूल ऑफ ऑनलाईन लर्निंग विद्याशाखा संचालकांनी सादर केलेल्या इतिवृत्तातील सर्व विषयांना तसेच 'परसबाग' आणि 'मूल्यशिक्षण-मूलभूत' या प्रमाणपत्र शिक्षणक्रमाच्या अध्ययन साहित्यास (प्रिंट व नॉनप्रिंट) सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 65.3.6<br>परीक्षा विभाग | स्वयम-अंतर्गत नोंदणी केलेल्या ऑनलाईन अभ्यासक्रमाच्या परीक्षेचे आयोजन विद्यापीठाद्वारे करणेबाबतचा परीक्षा मंडळाचा ठराव विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर... |

| | | |
|---|---|---|
| | | **टिपणी** — स्वयम- अंतर्गत नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेचे आयोजन विद्यापीठ स्तरावर करण्यास परीक्षा मंडळाने सर्वानुमते मान्यता दिली.<br>महाराष्ट्रातील इतर अकृषी विद्यापीठांमध्येही स्वयम अंतर्गत विद्यार्थ्यांची नोंदणी आहे. त्यानुसार स्वयंम् अंतर्गत शिक्षणक्रमाच्या प्रश्नपत्रिका तयार करणे, ऑनलाईन/ऑफलाईन परीक्षेचे आयोजन करणे यासाठी इतर अकृषी विद्यापीठांनाही याबाबत कामकाज करावे लागणार असल्यामुळे या कामांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी प्रत्येक विद्यापीठास या कामाची स्वतंत्र जबाबदारी सोपविता येईल. याकरीता य.च.म.मुक्त विद्यापीठ व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांनी संयुक्तपणे सर्व अकृषी विद्यापीठांच्या प्र-कुलगुरू व परीक्षा नियंत्रक यांचेसमवेत बैठक आयोजित करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले. उपरोक्त विषय मा. विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर..<br>**ठराव** — परीक्षा मंडळ ठराव क्र. 52.5.02 अन्वये केलेल्या शिफारशीस अनुसरून स्वयम अंतर्गत प्रवेश घेतलेल्या सर्व विषयांच्या परीक्षेची सुविधा या विद्यापीठाकडे असेलच असे नसल्याने इतर विद्यापीठांशी सामंजस्य करार करण्यात यावा. ज्या विषयांची परीक्षा घेण्याची सुविधा या विद्यापीठात नसेल अशा वेळी विद्यार्थ्याला इतर विद्यापीठात जेथे सुविधा उपलब्ध असेल तेथे परीक्षा देता येण्याबाबत विद्यार्थ्यांला सुचित करता येईल व तेथील गुणांच्या आधारे त्याचा स्वयम निकाल जाहीर करता येईल. सदर विषय सुकाणु समितीमार्फत इतर विद्यापीठात नेण्याची सुचना मा. कुलगुरूंनी केली. या सुचनेसह परीक्षा मंडळ ठरावानुसार करण्यात आलेल्या शिफारशींना सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 65.3.7<br>नोंदणी कक्ष | विद्यापीठात प्रवेश घेतेवेळी अनाथ विद्यार्थ्यांची फी माफ होणेबाबत....<br>**टिपणी** — महिला व बाल विभाग शासन निर्णय दिनांक 06.04.2023 मध्ये नमूद केलेल्या संस्थात्मक व संस्थाबाह्य या वर्गवारीमध्ये प्रवेशित असलेल्या व प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास यांचे सही शिक्का असलेले अनाथ प्रमाणपत्र सादर केल्यानंतर शून्य रूपये शुल्का ऐवजी रु. 200/- इतके नाममात्र शुल्क आकारण्याबाबत मा. विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर...<br>**ठराव** — अनाथ विद्यार्थ्यांची शिक्षणक्रमासाठी नोंदणी होण्यासाठी विद्यार्थ्यांकडून फक्त नोंदणी शुल्क घ्यायची सुचना करण्यात आली. परंतु मा. संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा संचालकांनी बी.एड. शिक्षणक्रम हा सेवांतर्गत विद्यार्थ्यांसाठी असल्याने ही विद्यार्थी अर्थार्जन करत करत शिकतात म्हणून त्यांचेकडून अनाथ विद्यार्थ्यांसाठी राखीव जागेतून प्रवेश द्यावा परंतु शिक्षणक्रमाचे पूर्ण शुल्क त्यांच्याकडून आकारावे असा शासन निर्णय असल्याचे नमूद केले. सबब बी.एड. व्यतिरिक्त इतर सर्व शिक्षणक्रमांच्या अनाथ विद्यार्थ्यांसाठी (अनाथाचे प्रमाणपत्र सादर करणाऱ्या) नोंदणी शुल्काव्यतिरिक्त इतर सर्व शुल्क माफ असण्याला सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 65.3.8<br>परीक्षा विभाग | विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमांचे शैक्षणिक वर्ष 2024-25 चे शैक्षणिक वेळापत्रक तयार करणेबाबत...<br>**टिपणी** — दि. 10.9.2024 रोजी परीक्षा मंडळ ठराव क्र. 52.4.1 नुसार प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक, प्रवेशाचा अंतिम दिनांक, विलंब शुल्कासह प्रवेश, अंतिम प्रवेशाचा दिनांक, Induction Programme, समंत्रण सत्रे (Contact Session) कालावधी, गृहपाठ सादरीकरणाच्या तारखा, परीक्षेचे अर्ज सादर करण्याच्या तारखा, परीक्षेचा संभाव्य कालावधी इत्यादी बाबींच्या समावेशासह विद्याशाखानिहाय शैक्षणिक वेळापत्रक तयार करण्यात यावे. |

| | | |
|---|---|---|
| | | असा ठराव झालेला होता. त्यानुसार समिती गठित करण्यात आली. सदर गठित समितीची दि. 29 ऑक्टोबर 2024 व दि. 27 नोव्हेंबर 2024 रोजी झालेल्या बैठकीत शैक्षणिक वर्ष 2024-25 चे शैक्षणिक वेळापत्रक तयार करण्यात आले आहे. सदरचे वेळापत्रक विद्वत परिषदेसमोर अवलोकनार्थ व मार्गदर्शनार्थ सविनय सादर...<br><br>**ठराव** – परीक्षा मंडळ ठराव क्र. 52.4.1 अन्वये केलेल्या शिफारशीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 65.3.9<br>कृषी विज्ञान विद्याशाखा | कृषी विज्ञान विद्याशाखेची दि. 29.06.2024 व दि. 03.01.2025 रोजी झालेल्या विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त मा. विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर....<br><br>टिपणी – दि. 29.06.2024 व दि. 03.01.2025 रोजी कृषी विज्ञान विद्याशाखेची विद्याशाखा परिषद आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त मा. विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर....<br><br>**ठराव** – मा. संचालक, कृषी विज्ञान केंद्र यांनी विद्याशाखा परिषदेच्या इतिवृत्तातील विषयांबाबत माहिती दिली.<br><br>1) कृषीविज्ञान विद्याशाखेमध्ये नव्याने सुरु करण्यात येणाऱ्या शिक्षणक्रमांसाठी नवीन तसेच जुन्या अभ्यासकेंद्रांसाठी प्रत्येकी तपासणी शुल्क श्वान पालन प्रमाणपत्र शिक्षणक्रमासाठी रुपये 5,000/-, माती विना शेती (हायड्रोपोनिक्स) प्रमाणपत्र शिक्षणक्रमासाठी रुपये 15,000/- आणि गोड्या पाण्यातील मत्स्यपालन प्रमाणपत्र शिक्षणक्रमासाठी रुपये 15,000/- इतके करण्यात यावे.<br><br>2) कृषीविज्ञान विद्याशाखेमध्ये नव्याने सुरु करण्यात येणाऱ्या गोड्या पाण्यातील मत्स्यपालन प्रमाणपत्र शिक्षणक्रम राबविण्यासाठी अभ्यासकेंद्र पात्रतेबाबतच्या निकषांमध्ये पुढीलप्रमाणे बदल सुचविण्यात आला.<br>महाराष्ट्रातील कृषि महाविद्यालये / मत्स्य महाविद्यालये / कृषि विज्ञान केंद्र/ मत्स्यविज्ञान विभाग असलेली विज्ञान महाविद्यालये / मत्स्यपालन केंद्रे किंवा संस्था ज्यांच्याकडे B.F.Sc. (Bachelor of Fisheries Science) अशा पात्रतेचे तज्ज्ञ प्राध्यापक असणे आवश्यक. |
| | 65.3.10<br>परीक्षा विभाग | श्रेणी/गुण सुधार योजना (Improvement of Class/Grade Scheme) नियमावलीमध्ये बदल करणेबाबत..<br><br>**टिपणी** – बऱ्याचदा विद्यार्थी श्रेणी/गुण सुधार करण्यासाठी विनंती अर्ज सादर करतात. त्यासंदर्भात यापूर्वी जी नियमावली तयार केलेली आहे. त्यात काही सुधारणा/बदल करणे आवश्यक असल्याने सदरचा विषय परीक्षा मंडळात सादर केला होता. परीक्षा मंडळाचा ठराव मा. विद्वत परिषदेसमोर सादर करणेबाबत सर्वानुमते ठरल्याने सदरचा विषय मा. विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर....<br><br>**ठराव** – मा. परीक्षा मंडळाचा ठराव क्र. 53.4.02 अन्वये केलेल्या शिफारसीतील मुद्दा क्र. 02 मध्ये कमीत कमी 1 अभ्यासक्रम किंवा जास्तीत जास्त 1/3 अभ्यासक्रमांची परीक्षा देणे अनुवार्य आहे. तसेच मुद्दा क्र. 3 मध्ये विषयाऐवजी अभ्यासक्रम असा बदल करून परीक्षा मंडळाने केलेल्या शिफारसींना सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | 65.3.11<br>परीक्षा विभाग | आर्टीलरी सेंटर मधील विद्यार्थ्यांच्या प्रमाणपत्र (Certificate) छपाईबाबतचा विषय मा. विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर...<br>**टिपणी** — आर्टिलरी सेंटर नाशिकरोड कॅम्प, नाशिक यांच्याशी झालेल्या सामंजस्य करारानुसार आर्टिलरी सेंटर येथे जवानांकरिता सोबत जोडलेल्या (सहपत्र 1) नुसार विविध 18 शिक्षणक्रम राबविण्यात येत आहे. त्यांना देखील All India Institute of Local Self Government यांचप्रमाणे आर्टीलरी सेंटरमधील प्रवेशीत विद्यार्थ्यांना देण्याबाबतचा प्रस्ताव मा. विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव व विचारार्थ सादर...<br>**ठराव** — विद्यापीठ ज्या संस्थांशी प्रमाणपत्र/पदविका हे शिक्षणक्रम सुरू करण्यासंदर्भात करार करते, तसेच या करारांतर्गत या संस्था सदर विद्यार्थ्यांचे Teaching, Learning, Evaluation करून परीक्षेचे आयोजन संस्थास्तरावर करते अशा विद्यार्थ्यांना सोबत जोडलेल्या नमुन्यानुसार (Format) प्रमाणपत्र देण्यास मान्यता देण्यात आली. |
| | 65.3.12<br>संगणकशास्त्र विद्याशाखा | संगणकशास्त्र विद्याशाखेची दि. 27 जून 2024 व दि. 23.12.2024 रोजी झालेल्या विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त मा. विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर....<br>**टिपणी** — दि. 27 जून 2024 व दि. 23.12.2024 रोजी संगणकशास्त्र विद्याशाखेची विद्याशाखा परिषद आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त मा. विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर....<br>**ठराव** — मा. संचालक, संगणकशास्त्र विद्याशाखा यांनी विद्याशाखा परिषदेतील महत्त्वाचा विषय असलेल्या 'Cyber Crime Investigation' (गुन्हे अन्वेषण विभाग) या पोलिस कॉन्स्टेबलसाठी ऑनलाईन शिक्षणक्रमाचा उल्लेख केला. मा. कुलगुरूंनी याबाबतची माहिती सर्व सभासदांना अवगत करून दिली. ह्या शिक्षणक्रमाची संकल्पना गुन्हे अन्वेषण विभागात 20 वर्षे काम केलेल्या अनुभवी अधिकाऱ्यांनी पुढे आणली. त्यासाठी कायदेशीर बाबींचा समावेश असलेले अध्ययन साहित्यही त्यांनी तयार करून दिले आहे. फक्त त्यांची ऑनलाईन परीक्षा घेण्यासाठी आवश्यक सॉफ्टवेअर आणि परीक्षा पद्धती, परीक्षा केंद्रे यांबाबत अजून निश्चिती झालेली नसल्याचे संचालकांनी सांगितले. परीक्षा पद्धती, सॉफ्टवेअर निश्चित झाल्यानंतर ते विद्याशाखा परिषदेत मंजूर करून मा. विद्वत परिषदेच्या वतीने मा. कुलगुरूंकडून मंजूर करून घेण्याच्या मा. कुलगुरूंच्या सुचनेसह इतिवृत्त सर्वानुमते मंजूर करण्यात आले. |
| | 65.3.13<br>वाणिज्य व्यवस्थापन विद्याशाखा | वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेची दि. 10 जानेवारी 2025 रोजी झालेल्या विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त मा. विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर...<br>**टिपणी** — दि. 10 जानेवारी 2025 रोजी झालेल्या विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त मा. विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर....<br>**ठराव** — मा. संचालक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा यांनी विद्याशाखा परिषदेतील महत्त्वाचे मुद्दे विचारार्थ आणि मान्यतेसाठी सादर केले. मा. संचालक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा यांनी दि. 10 जानेवारी 2025 रोजी झालेल्या विद्याशाखा परिषद इतिवृत्तास मा. कुलगुरु यांनी सूचित केलेल्या सूचनासहीत इतिवृत्तास सर्वानूमते मान्यता देण्यात आली.<br>1) त्यात मुख्यत्वे विद्याशाखेमध्ये सुरु असलेल्या सध्याच्या MBA शिक्षणक्रमाच्या तीन Specializationच्या शिवाय नवीन चार<br>A-Supply Chain Management<br>B- Transport Management<br>C- Co-Operative Management<br>D- Event Management |

| | | |
|---|---|---|
| | | या नवीन MBA Specialization शिक्षणक्रमांना शैक्षणिक वर्ष 2025-26 पासून सुरु करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>2) तसेच Diploma in Planning & Management of MSME हा पदविका शिक्षणक्रम सुरु करण्यास मान्यता देण्यात आली.<br>3) विद्याशाखेमध्ये सुरु करण्यात आलेल्या B.A- Facility & Services Management शिक्षणक्रमासाठी वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा (54165) या अभ्यासकेंद्रास मान्यता देण्यात आली असून BVG Groupशी चर्चा करुन संपूर्ण महाराष्ट्रात त्यांच्या इतर केंद्रांवर प्रात्यक्षिक घेण्यासाठी व त्यांच्या केंद्रावर विद्यार्थ्यांसाठी इंटर्नशिपसाठी चर्चा करुन अशा सर्व केंद्रांना सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>4) MBA, M.Com. या दोन्ही शिक्षणक्रमांच्या प्रोजेक्ट रिपोर्ट, फिल्ड प्रोजेक्ट, रिसर्च प्रोजेक्टमध्ये एखाद्या विद्यार्थ्यास कमी गुण मिळाल्यास त्याने सदर प्रोजेक्टमध्ये गुण वाढविणेसाठी पूर्नसादरीकरणास (Resubmission) साठी सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>5) वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेत राबविण्यात येणाऱ्या एम.बी.ए. शिक्षणक्रमासाठी शैक्षणिक वर्ष 2023-24 मध्ये AICTE ची मान्यता घेण्यात आली. AICTE ने स्कूल ऑफ कॉमर्स अँड मॅनेजमेंट 54165 या एकमेव अभ्यासकेंद्राला मान्यता देण्यात आली. त्यामुळे शै. वर्ष 23-24 मध्ये एम.बी.ए. शिक्षणक्रमाच्या प्रथम वर्षास प्रवेशित झालेले सर्व विद्यार्थी 54165 या अभ्यासकेंद्रावर प्रवेशित करण्यात आले होते. परंतु 23-24 मध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताकरीता द्वितीय वर्षाचे प्रवेश त्यांच्या सोईच्या अभ्यासकेंद्रावर (मदतकेंद्रावर) करण्यात आलेले आहे. या कृतीस मा. व्यवस्थापन मंडळाने यांनी मान्यता दिली आहे. विद्यार्थ्यांना भविष्यात AICTE मंजूर एम.बी.ए. शिक्षणक्रमाची वैधता (Authenticity) आणि नोंदणी संबधित कोणत्याही अडचणी टाळण्यासाठी त्यांच्या द्वितीय वर्ष आणि एकत्रित अंतिम गुणपत्रकावर तसेच पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्रावर स्कूल ऑफ कॉमर्स अँड मॅनेजमेंट, वाय.सी.एम.ओ.यु. नासिक, 54165 हे एकमेव अभ्यासकेंद्र म्हणून नमूद करावे, असे सर्वांनुमते ठरविण्यात आले.<br>मा. कुलगुरूंनी सुचित केलेल्या सुचनांसह इतिवृत्तास मान्यता देण्यात आली. |
| 65.4.0 | | **मा.अध्यक्षांच्या परवानगीने येणारे ऐनवेळेचे विषय** |
| | 65.4.1<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखा | शिक्षणशास्त्र विद्याशाखेची विद्याशाखा परिषद बैठक क्र. 63 दि. 11 जानेवारी 2025 रोजी घेण्यात आली. सदर बैठकीचे सदर बैठकीचे इतिवृत्त मा. विद्वत परिषदेच्या मान्यतेस्तव सादर...<br>**टिपणी** – शिक्षणशास्त्र विद्याशाखेची विद्याशाखा परिषद बैठक क्र. 63 दि. 11 जानेवारी 2025 रोजी घेण्यात आली. सदर बैठकीचे इतिवृत्त मा. विद्वत परिषदेच्या अवलोकनार्थ आणि मान्यतेस्तव सादर...<br>**ठराव** – शिक्षणशास्त्र विद्याशाखा संचालकांनी विद्याशाखा परिषदेत सादर केलेल्या विषयांबाबत सर्व सदस्यांना थोडक्यात माहिती दिली. विद्याशाखा परिषदेच्या इतिवृत्तास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 65.4.2<br>विद्यार्थी सेवा विभाग | बंदिजनांसाठी नाममात्र नोंदणी शुल्क रु. 10/- ठेवणेबाबतचा विषय मान्यतेस्तव सादर<br>**टिपणी** – विद्यापीठाने महाराष्ट्रातील कारागृहांशी सामंजस्य करार करून बंदिजनांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी पाऊल उचलले. त्याअंतर्गत बी.ए. आणि बी.कॉम. शिक्षणक्रमांसाठी महाराष्ट्रातील कारागृहातून आतापर्यंत 1400 बंदिजनांनी प्रवेश घेतला आहे. |

| | | |
|---|---|---|
| | | वेदिजन अर्थाजन करत नसल्यामुळे त्यांची फक्त शिक्षणक्रमासाठी नोंदणी करण्यासाठी लागणाऱ्या नोंदणीसाठी नाममात्र रु. 10/- इतके नोंदणी शुल्क आकारण्याचा विषय मा. विद्वत परिषदेच्या अवलोकनार्थ आणि मान्यतेस्तव सादर...<br>**ठराव** – संचालक, विद्यार्थी सेवा विभाग यांनी सादर केलेल्या विषयास मा. सदस्यांनी सर्वानुमते मान्यता दिली. तसेच हेच शुल्क अंध, तृतीयपंथी (ट्रान्सजेंडर), अनाथ आणि आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांचे पाल्य यांचेसाठीही रु. 10/- इतकेच नोंदणी शुल्क आकारण्यात यावे असे सुचित केले. |
| | 65.4.3<br>वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | मंदिर व्यवस्थापन पदविका व मॉल व्यवस्थापन पदविका या विषयांना मान्यतेस्तव सादर...<br>**टिपणी** – मा. डॉ. दाबक सरांनी सुचविल्यानुसार मंदिर व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाचे काम विद्याशाखेत 4 महिन्यांपासून सुरू करण्यात आले आहे. तसेच मॉल व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाचेही काम सुरू करण्यात आले आहे. या दोनही शिक्षणक्रमांचा आराखडा तयार करण्यात आला आहे. सदर दोन्ही पदविका शिक्षणक्रम मान्यतेस्तव सादर...<br>**ठराव** – विद्याशाखेमध्ये Diploma in Temple Management आणि Diploma In Mall Management हे दोन पदविका शिक्षणक्रम सुरु करण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली.<br>Diploma In Temple Management ह्या पदविका शिक्षणक्रमासाठी PAC (तज्ज्ञ सल्लागार समिती) वर महाराष्ट्रातील तसेच इतर महत्वाच्या देवस्थानातील व्यवस्थापन सदस्य यांची नियुक्ती करावी. असे सूचित करण्यात आले.<br>मा. कुलगुरुंनी सुचित केलेल्या सुचनांसह या दोन्ही पदविका शिक्षणक्रमांना तत्वत: मान्यता देण्यात आली. |
| | 65.4.4<br>सर्व विद्याशाखा | जानेवारी 2025 पासून सुरु होणाऱ्या सर्व शिक्षणक्रमांच्या प्रवेशांना आणि माहितीपुस्तिकांना मान्यतेस्तव सादर...<br>**टिपणी** – सर्व विद्याशाखांच्या सर्व शिक्षणक्रमांच्या जानेवारी 2025 पासून सुरु होणाऱ्या सर्व प्रवेशांसाठी आणि शिक्षणक्रमांच्या माहितीपुस्तिकांच्या मान्यतेसाठीचा विषय मा. विद्वत परिषदेच्या मान्यतेसाठी सादर...<br>**ठराव** – संचालक, मानव्यविद्या विद्याशाखा यांनी मांडलेल्या सूचनेनुसार जानेवारी 2025 पासून सुरू होणाऱ्या सर्व शिक्षणक्रमांच्या माहितीपुस्तिका आणि प्रवेशांना सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | | मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभा समाप्त करण्यात आली. |

**अध्यक्ष**
**विद्वत परिषद**

**सदस्य सचिव**
**विद्वत परिषद**